## || श्री लक्ष्मीनारायण प्रसन्न ||

लक्ष्मीरमणा भव भय हरणा
चित्सुखसदना ऋद्कमला ||
बहुप्रेमाने पंचारती ही
करित असो वा तुज विमला ||धृ||

दृढ भक्तीने पाहुनी दिधले
दिधले धृवपद धृव बाळाला
अर्जुन रथी ही सारथ्य करुनी
अवगारिले अश्वाला ||१||

ऐकुनी ऐशा तव औदार्या
आठवितो तव पद कमला
निजभक्तीने रुक्मीणी सुत हा
देई दर्शना तव विमला ||२||